PRIMUS PARTNERS®

## Quote by Aarti Harbhajanka, Managing Director, Primus Partners

Published in Prahaar
August 26, 2026

# ‘स्पेसफेस्ट’अंतराळात नवकल्पनांना व्यासपीठ

**मुंबई :** नोडविन गेमिंगतर्फे महाराष्ट्र सरकारच्या सहकार्याने ‘स्पेसफेस्ट’ या अंतराळ, विज्ञान, नवकल्पना आणि सायन्स-फिक्शनला समर्पित महोत्सवाची घोषणा करण्यात आली. मुंबईतील ट्रायडंट हॉटेलमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत उद्योगमंत्री उदय सामंत, प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र सिंह कुशवाह, नोडविन गेमिंगचे सहसंस्थापक अक्षत राठी आणि प्रायमस पार्टनर्सच्या आरती हरभजनका उपस्थित होते. या महोत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील स्पेस-टेक स्टार्टअप्सना आपले तंत्रज्ञान व नवकल्पना सादर करण्यासोबतच गुंतवणूकदार आणि उद्योगांशी संपर्क साधण्याची संधी मिळणार आहे. विद्यार्थी आणि तरुणांना अंतराळ क्षेत्रातील करिअरच्या संधी, तंत्रज्ञान आणि संशोधनाची माहिती मिळावी, हा महोत्सवाचा प्रमुख उद्देश आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी महाराष्ट्राला भारतातीलच नव्हे, तर जागतिक अंतराळ क्षेत्रातील महत्त्वाचे केंद्र बनविण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे सांगितले. ‘स्पेसफेस्ट’चे आयोजन फेब्रुवारीमध्ये करण्याचा प्रस्तावही त्यांनी मांडला. यामुळे रोजगार आणि अंतराळ क्षेत्रासाठी आवश्यक वातावरण निर्मितीस अधिक वेळ मिळेल, असे त्यांनी नमूद केले. डॉ. पी. अनबलगन यांनी भारताच्या एरोस्पेस, संरक्षण आणि नेव्हिगेशनशी संबंधित सुमारे २५ टक्के यंत्रणा महाराष्ट्रात तयार होत असल्याचे सांगितले. तसेच २०४० पर्यंत भारतातील स्पेस-टेक क्षेत्र १०० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचण्याचा अंदाज असून, महाराष्ट्रासाठी या क्षेत्रात मोठ्या संधी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**Read on:**
Dainik Prahar e-paper
CXO Today